





सायं दैनिक


# नांदेड वार्ता

www.nandedwarta.com

•वर्ष २४ वे • अंक २४६ • सोमवार दि.२९ जून २०२६ • नांदेड • पोस्ट परवाना क्र.जी.-२/आरएनपी/एनएनडी-२६२/२०२३-२०२५ • पाने ४ • किंमत १ रु.


## नसरापूर बालिका हत्या प्रकरणात नराधमास फाशीची शिक्षा

### विशेष न्यायालयाचा कठोर निर्णय;पीडित कुटुंबाला न्याय मिळाल्याची भावना



पुणे:पुणे जिल्ह्यातील भोर तालुक्यातील नसरापूर येथे साडेतीन वर्षांच्या चिमुरडीवर लैंगिक अत्याचार करून तिची निर्घृण हत्या करणाऱ्या भीमराव कांबळे याला पुण्यातील विशेष न्यायालयाचे न्या.एस.आर. साळुंके यांनी दया दाखवण्यास नकार देत मरेपर्यंत फाशीची शिक्षा सुनावली आहे. हा गुन्हा दुर्मीळातील दुर्मीळ स्वरूपाचा असल्याचे निकाल पत्रात नमूद केले आहे. शिक्षा जाहीर होताच न्यायालय परिसरात भावनिक वातावरण निर्माण झाले असून पीडित चिमुरडीच्या कुटुंबीयांना अश्रू अनावर झाले.

पुणे जिल्ह्यातील नसरापूर येथे काही महिन्यापूर्वी एका साडेतीन वर्षीय बालिकेवर विकृत मानसिकेतच्या नराधमाने लैंगिक अत्याचार करीत तीची हत्या केली होती. याप्रकरणी पुणे येथील फास्टट्रॅक न्यायालय स्थापन करण्यात आले होते. विशेष न्यायालयाने मागील आठवड्यात दोषी ठरवले होते. आज शिक्षेचा निकाल देताना न्यायालयाने आरोपीचा पूर्वीचा गुन्हेगारी इतिहास, त्याची विकृत मानसिकता आणि पीडितेचे अल्पवय याचा विशेष उल्लेख केला. स्वतःची वासना शमविण्यासाठी आरोपीने हे अमानुष कृत्य केल्याचे पुराव्यांवरून स्पष्ट झाल्याचे न्यायालयाने नमूद केले. आरोपीचे वय ६५ वर्षे असले तरी त्याच्या कृत्यात कोणताही पश्चात्ताप किंवा सुधारण्याची शक्यता दिसत नसल्याने मृत्युदंडाची शिक्षा आवश्यक असल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले.न्यायालयाने निरीक्षण नोंदवताना, पीडिता अवघी साडेतीन वर्षांची असून ती पूर्णपणे असहाय्य अवस्थेत होती. हत्येनंतरही आरोपीने तिच्यावर लैंगिक अत्याचार सुरूच ठेवले. शवविच्छेदन अहवालातून अत्याचार झाल्याचे सिद्ध झाले असून आरोपीने चिमुरडी जिवंत राहण्याची कोणतीही शक्यता ठेवली नव्हती, असेही न्यायालयाने नमूद केले. यापूर्वीही आरोपीने कुटुंबातील अल्पवयीन मुलीवर अत्याचार केल्याचा तसेच एका वृद्ध महिलेवर हल्ला केल्याचा उल्लेख करत हा गुन्हा समाजमन हादरवणारा असल्याचे न्यायालयाने म्हटले.शिक्षा सुनावल्यानंतर न्यायाधीशांनी आरोपीला उद्देशून आता फासावर चढा असे कठोर शब्द उच्चारल्याने न्यायालयात काही काळ शांतता पसरली.दरम्यान, या निकालाचे विविध स्तरांतून स्वागत करण्यात आले. पान ४ वर

## नायगावात धाडसी घरफोडी;१ लाख ७० हजार रुपयांची रोकड लंपास

नायगाव/प्रतिनिधी-नायगाव शहरातील व्यंकटेश नगर परिसरात पुन्हा एकदा धाडसी घरफोडीची घटना घडली असून, चोरट्यांनी घरातून सुमारे ९ लाख ७० हजार रुपयांची रोकड लंपास केल्याची घटना घडली आहे. या घटनेमुळे शहरात भीतीचे वातावरण निर्माण झाले.

या घटनेची माहिती अशी की, नायगाव पंचायत समितीमध्ये कनिष्ठ सहाय्यक म्हणून कार्यरत असलेले माधव कोटकर हे देवदर्शनासाठी बाहेर गेले होते. २८ जूनच्या रात्री उशिरा घरी परतल्यानंतर घरफोडी झाल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. कपाटातील ९ लाख ७० हजार रुपयांची रक्कम चोरट्यांनी चोरुन नेली आहे. कोटकर यांनी सदरील रक्कम प्लॉट घेण्यासाठी एकत्रीत जमा केली होती. सदरील रक्कम घरात ठेवून ते देवदर्शनासाठी कुटुंबियांसमवेत गेले होते. चोरीच्या घटनेची माहिती त्यांनी तत्काळ नायगाव पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.तक्रारीनंतर पोलिसांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला व तपास सुरू केला. तसेच २९ जून रोजी श्वानपथकाचीही मदत घेण्यात आली असून, आरोपींचा शोध सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. दरम्यान, नायगाव शहर व परिसरात सातत्याने घरफोडीच्या घटना घडत असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. वारंवार होणाऱ्या घरफोड्यांतील अनेक गुन्ह्यांचा अद्याप उलगडा झालेला नाही.

## ‘शिंदेंना फडणवीसांना रोखण्याची सुपारी’

### शिर्डीतून उद्धव ठाकरेंचा भाजपवर घणाघात

अहिल्यानगर: शिवसेनेतील खासदारांच्या फुटीमागे भाजपचे नियोजन असल्याचा आरोप करत, एकनाथ शिंदे यांना देवेंद्र



फडणवीस यांना राजकीयदृष्ट्या गुंतवून ठेवण्याची सुपारी देण्यात आली आहे, असा दावा शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी शिर्डीतील जाहीर सभेत केला. त्यासोबत त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, भाजप आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला. पान ४ वर




वटसावित्री पौर्णिमेनिमित्त शहरातील अनेक भागात असलेल्या वडाच्या झाडाची महिलांनी भक्तीभावाने पूजा केली. हिंदू संस्कृतीत वटसावित्री पौर्णिमेला एक वेगळे महत्व आहे.

## विधान परिषद उपसभापती पदासाठी १ जूलैला निवडणूक

### नीलम गोऱ्हेंच्या पुनर्निवडीची दाट शक्यता

मुंबई/प्रतिनिधी-राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनादरम्यान विधान परिषदेच्या उपसभापतीपदाची निवडणूक येत्या १ जुलै रोजी होणार असून, या पदावर शिवसेना (शिंदे गट) नेत्या डॉ. नीलम गोऱ्हे यांची पुन्हा निवड होण्याची दाट शक्यता व्यक्त केली जात आहे. विधान परिषद सभापती राम शिंदे यांनी सोमवारी उपसभापती निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला.

राम शिंदे यांनी दिलेल्या माहितीनुसार, महाराष्ट्र विधान परिषद नियम ६ व ७ नुसार उपसभापतीपदासाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची अंतिम मुदत ३० जून रोजी दु. १२ वाजेपर्यंत असेल. उमेदवारी अर्जांची छाननी त्याच दिवशी दु.१ वा.करण्यात येणार असून,त्यानंतर १ जुलै रोजी विधान परिषद सभागृहात उपसभापतींची निवडणूक पार पडणार आहे. अर्ज विधानमंडळ सचिवालयाचे सचिव डॉ.विलास आठवले यांच्याकडे विधानभवनातील कक्ष क्रमांक ९०३ येथे सादर करावे लागणार आहेत. पान ४ वर

## बसस्थानक परिसरातील चहा-कॉफी सेंटरला आग

### ७ लाख रुपयांचे नुकसान

नांदेड/प्रतिनिधी-नांदेड शहरातील मुख्य बसस्थानक परिसरात असलेल्या चहा-कॉफी सेंटर या दुकानाला आज सकाळी शॉकसर्कीटमुळे आग लागून जवळपास ७ लाख रुपयांचे नुकसान झाले आहे. अग्नीशामन दलाच्या पथकाने ही आग अटोक्यात आणली आहे.

बसस्थानक परिसरात संजय बहादुरसिंग ठाकूर यांचे मॅजीक चहा-कॉफी सेंटर हे दुकान आहे. आज (सोमवार) सकाळी या दुकानाला शॉकसर्कीटमुळे आग लागली. या घटनेची माहिती तात्काळ महानगर पालिकेच्या अग्नीशामन विभागाला देण्यात आली. सदरील आग आजुबाजूच्या दुकानांना लागण्याची भिती वाटू लागली होती. अग्नीशामन विभागाचे अधिकारी के.जी. दासरे यांच्या मार्गदर्शनाखाली अग्नीशामन विभागाच्या कर्मचाऱ्यांनी तात्काळ घटनास्थळी पोहचून आग आटोक्यात आणली. या आगीत दुकानातील सिलिंग, फ्रीज, थर्मास, स्टीलचे भांडी व इतर साहित्य जळून खाक झाले आहे. या आगीत जवळपास ७ लाख रुपयांचे नुकसान झाले. आगीच्या घटनेमुळे परिसरातील नागरिकांमध्ये घबरहाट निर्माण झाली होती.

## नांदेड परिसरात रिमझिम पाऊस

नांदेड/प्रतिनिधी-प्रदीर्घकाळ दडी मारलेल्या पावसाने काल रात्रीपासून पुन्हा बरसण्यास सुरुवात केली आहे. काल रात्री व आज दुपारपासून नांदेड शहर व परिसरात रिमझिम पाऊस बरसत आहे. पाऊस बरसत असला तरी वातावरणातील उकाडा कायम आहे. यावर्षी पावसाने जवळपास जून महिन्यात दडी मारली. आता जूनच्या शेवटच्या आठवड्यात रिमझिम पाऊस पडत असल्याने त्रप्त उन्हापासून नांदेडकरांनी सुटकेचा निःश्वास सोडला.

## एनडीसीसी बँकेच्या निवडणुकीसाठी श्रावण पा.भिलवंडे यांचा उमेदवारी अर्ज दाखल

नायगाव/प्रतिनिधी-नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक मंडळाच्या निवडणुकीसाठी भाजपाचे श्रावण पाटील भिलवंडे यांनी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला आहे.



नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या २३ संचालकांच्या निवडीसाठी निवडणूक होत आहे. प्रक्रिया पणन मतदारसंघातून भाजपाचे माजी पं.स.सभापती श्रावण पाटील भिलवंडे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी भाजप प्रदेश कार्यकारिणी सदस्य राजेश देशमुख कुंटूरकर, बालाजी बच्चेवार, रुपेश कुंटूरकर, आनंदराव बावणे भोपाळकर, सूर्याजी चाडकर, ज्येष्ठ पत्रकार भूषण पारळकर, गोविंद नरसीकर, दत्ता पाटील होटाळकर, बालाजी गंगासागरे यांच्यासह भाजपचे अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते आणि समर्थक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## माहूर पोलिस वसाहतीची दयनीय अवस्था;आठ वर्षांपासून निधी मंजूर तरी काम शून्य



सरफराज दोसानी

माहूर:जनतेच्या सुरक्षेसाठी जीवाची पर्वा न करता दिवस-रात्र कर्तव्य बजावणाऱ्या पोलिस कर्मचाऱ्यांच्या स्वतःच्या कुटुंबांची सुरक्षा मात्र वाऱ्यावर सोडण्यात आली आहे. माहूर पोलिस ठाण्यालगत असलेली पोलिस वसाहत अक्षरशः मृत्यूच्या छायेत उभी असून, मोडकळीस आलेल्या या इमारतींमध्ये पोलिस कर्मचारी आपल्या कुटुंबासह जीव मुठीत धरून राहत आहेत. शासन आणि प्रशासनाच्या उदासीनतेमुळे पोलिसांच्या निवासाचा प्रश्न गंभीर बनला आहे.

माहूर पोलिस ठाण्यात ४५ कर्मचारी कार्यरत असताना त्यांच्यासाठी केवळ १५ निवासस्थाने उपलब्ध आहेत. त्यापैकी एक खोली पूर्णतः धोकादायक झाल्याने बंद करण्यात आली आहे. उर्वरित १४ खोल्यांमध्ये कर्मचारी नाईलाजाने वास्तव्यास आहेत. अनेक खोल्यांच्या भिंतींना मोठमोठे तडे गेले असून छताचे प्लास्टर कोसळत आहे. पावसाळ्यात गळती, विजेच्या जुनाट वायरिंगमुळे शॉकचा धोका आणि परिसरात सरपटणाऱ्या प्राण्यांचा वावर ही रोजचीच बाब झाली आहे. विशेष म्हणजे, सन २०१८ मध्ये तत्कालीन जिल्हा पोलिस अधीक्षक संजय जाधव यांच्या कार्यकाळात माहूर आणि सिंदखेड पोलिस वसाहतींच्या पुनर्बांधणीसाठी जिल्हा नियोजन समितीकडून तब्बल २ कोटी ६५ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला होता. मात्र आठ वर्षांचा कालावधी उलटूनही फाईल कागदावरच अडकून पडली आहे. निधी मंजूर झाला, घोषणा झाल्या, बैठका झाल्या; पण प्रत्यक्षात एकही वीट रचली गेली नाही. यामुळे प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. महाराष्ट्रात सरकारे बदलली, गृहमंत्री बदलले, घोषणा बदलल्या; पण पोलिसांच्या निवासाचा प्रश्न मात्र कायम राहिला. जनतेच्या घरांचे रक्षण करणाऱ्या पोलिसांना स्वतःच्या कुटुंबासाठी सुरक्षित छप्पर मिळू नये, ही राज्यासाठी लाजिरवाणी बाब आहे. दुर्गम भागात सेवा बजावणाऱ्या पोलिसांच्या मुलांना शिक्षण, आरोग्य आणि मूलभूत सुविधांपासून वंचित राहावे लागत आहे. तरीही त्यांच्या समस्यांकडे शासनाचे दुर्लक्ष होत असल्याची भावना पोलिस वर्तुळात व्यक्त होत आहे. आज परिस्थिती अशी आहे की, जीर्ण झालेल्या या वसाहतीतील एखादी भिंत किंवा छताचा भाग कोसळून मोठी दुर्घटना घडल्याशिवाय प्रशासन जागे होणार नाही का, असा संतप्त सवाल नागरिक उपस्थित करीत आहेत. एखाद्या सामान्य नागरिकाच्या घराची अशी अवस्था असती तर प्रशासनाने तत्काळ कारवाई केली असती. मग जनतेच्या सुरक्षेसाठी रात्रंदिवस झटणाऱ्या पोलिस कर्मचाऱ्यांच्या सुरक्षितते-बाबत इतकी उदासीनता का? माहूर पोलिस वसाहतीचा प्रश्न आता केवळ निवासाचा राहिलेला नाही, तर तो पान ४ वर

# पेपर फुटीचा 'कोरोना'...; परीक्षा पद्धतीला लागलेली जागतिक महामारी!

सुमारे तीन-चार वर्षांपूर्वी 'कोरोना' नावाच्या एका सूक्ष्म आणि संसर्गजन्य विषाणूने संपूर्ण जगाची गती रोखली होती. या जागतिक महामारीमुळे प्रगत देशांपासून ते विकसनशील देशांपर्यंत सर्वत्र लॉकडाऊन घोषित करावा लागला, उद्योगधंदे कुलूपबंद झाले आणि जागतिक अर्थव्यवस्था अक्षरशः रसातळाला गेली. कोट्यवधी लोकांचे रोजगार हिरावून घेणारा हा आजार एका माणसाकडून दुसऱ्या माणसाकडे वेगाने पसरत होता. आज कोरोनाची ती महामारी संपली असली, तरी भारताच्या शैक्षणिक आणि प्रशासकीय व्यवस्थेला एका नव्या 'कोरोना'ने विळखा घातला आहे, आणि तो म्हणजे पेपर फुटीचा कोरोना! एकामागून एक होणारे पेपर फुटीचे गैरप्रकार, परीक्षांमधील सावळागोंधळ आणि प्रशासनाची कमालीची अनास्था यामुळे देशातील आणि महाराष्ट्रातील कोट्यवधी विद्यार्थ्यांचे भविष्य आज लॉकडाऊनमध्ये अडकल्यासारखे अंधकारमय झाले आहे.गेल्या दोन-तीन वर्षांपासून देशातील सर्वात महत्त्वाची मानली जाणारी वैद्यकीय प्रवेश पूर्व परीक्षा म्हणजेच 'नीट' वादाच्या भोवऱ्यात सापडत आहे. दरवर्षी यावर किरकोळ कारवाया केल्या जातात, मात्र मूळ आजारावर उपचार होत नाहीत. चालू वर्षात म्हणजेच मार्च २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या नीट परीक्षेचा पेपर फुटल्याचे उघड झाले. अनेक दलालांना, एजंटांना अटक झाली. पोलीस आणि तपास यंत्रणा नेहमीप्रमाणे दावा करत आहेत की, काही मॉडरेटर्स, पेपर सेटर्स आणि खाजगी कोचिंग क्लासेस चालकांना ताब्यात घेतल्यामुळे तपास योग्य दिशेने सुरू आहे. परंतु, सर्वसामान्य नागरिक, विद्यार्थी आणि पालकांचा या यंत्रणेवर काडीचाही विश्वास उरलेला नाही. या घोटाळ्याचे मुख्य सूत्रधार आणि 'नीट' घेणाऱ्या राष्ट्रीय परीक्षा एजन्सीमधील उच्चपदस्थ अधिकारी अजूनही मोकाट आहेत. त्यांच्यावर कठोर कायदेशीर कारवाई करण्याऐवजी केवळ त्यांच्या बदल्या करून प्रकरणावर पांघरूण घालण्याचा प्रयत्न केला जात आहे, हे संतापजनक आहे.हा संसर्ग केवळ 'नीट'पुरता मर्यादित राहिलेला नाही, तर तो आता राज्य पातळीवरील परीक्षांमध्येही झपाट्याने पसरत आहे. नीट पाठोपाठ सीईटीच्या प्रश्नपत्रिकांचा घोळ समोर आला आणि आता तर शिक्षक भरतीसाठी अनिवार्य असलेल्या 'टीईटी' (शिक्षक पात्रता परीक्षा) चा पेपर फुटल्याचे धक्कादायक वास्तव उघडकीस आले आहे. ठाण्यातून याप्रकरणी तीन जणांना पोलिसांनी ताब्यात घेतल्यामुळे अखेर ही परीक्षा रद्द करण्याची नामुष्की सरकारवर आली. नीट असो वा टीईटी, या परीक्षांवर लाखो गरीब आणि मध्यमवर्गीय विद्यार्थ्यांचे भवितव्य, त्यांच्या रात्रीचा दिवस करून घेतलेली मेहनत आणि पालकांचे कष्टाचे पैसे पणाला लागलेले असतात.वास्तविक पाहता, पूर्वीच्या काळात अशा प्रकारच्या अवाढव्य चाळणी परीक्षा नव्हत्या. परंतु, बदलत्या काळात लोकसंख्या वाढली, स्पर्धा गगनाला भिडली आणि त्या प्रमाणात नोकऱ्या व महाविद्यालयांमधील जागा मर्यादित राहिल्या. त्यामुळे गुणवत्तेची चाळणी लावून प्रवेश देणे किंवा नोकऱ्या देणे ही काळाची गरज बनली आहे, हे सत्य नाकारता येत नाही. त्यातच महाराष्ट्र शासनाने नव्याने रुजू झालेल्या शिक्षकांसाठी टीईटी परीक्षा अनिवार्य केली आहे. एकीकडे रोजगाराच्या संधी मर्यादित आणि दुसरीकडे शासनाचे कडक नियम, अशा कात्रीत तरुण अडकला आहे. आज भारत आणि महाराष्ट्रात बेरोजगारांची संख्या कोटींच्या घरात आहे. ही बेरोजगार तरुण मंडळी रोजगाराच्या आशेने दिवस-रात्र अभ्यास करत असतात. विशेष म्हणजे, शासन या परीक्षा मोफत घेत नाही. प्रत्येक परीक्षेसाठी विद्यार्थ्यांकडून हजारो रुपयांचे परीक्षा शुल्क मोठ्या प्रमाणात आकारले जाते. लाखो विद्यार्थ्यांकडून गोळा होणाऱ्या या शुल्काचा आकडा कोट्यवधींच्या घरात जातो. एवढा अवाढव्य निधी गोळा करूनही जर शासनाला आणि संबंधित परीक्षा मंडळांना एक परीक्षा पारदर्शक, सुरक्षित आणि कॉपीमुक्त वातावरणात घेता येत नसेल, तर या यंत्रणेची लायकी काय? जर परीक्षांची गोपनीयता राखता येत नसेल, तर सरळ-सरळ या परीक्षा पद्धती रद्द करून जुन्या पद्धतीचा विचार करण्याची वेळ आता आली आहे. एकामागून एक परीक्षांचे पेपर फुटत राहणे आणि परीक्षा रद्द होत राहणे, हा प्रकार तरुणांच्या मानसिकतेशी आणि त्यांच्या आयुष्याशी खेळणारा आहे. कोरोना ज्याप्रमाणे एका शरीरातून दुसऱ्या शरीरात पसरत होता, तसाच हा पेपरफुटीचा आजार एका परीक्षेतून दुसऱ्या परीक्षेत संक्रमित होत आहे. या आजाराला वेळीच रोखायचे असेल तर राजकीय आणि प्रशासकीय पातळीवर शस्त्रक्रिया करावी लागेल. लोकशाहीत नैतिकतेला सर्वोच्च स्थान असते. या सर्व राष्ट्रीय स्तरावरील परीक्षांची अंतिम जबाबदारी केंद्रीय शिक्षण मंत्र्यांची असते, तर राज्यातील परीक्षांची जबाबदारी राज्य शिक्षण मंत्र्यांची असते. आपल्या नाकाखाली एवढे मोठे गैरप्रकार होत असताना, केंद्रीय शिक्षण मंत्री किंवा महाराष्ट्राच्या शिक्षण मंत्र्यांनी अद्याप स्वतःची नैतिक जबाबदारी स्वीकारून राजीनामा दिलेला नाही, हे या देशाचे आणि राज्याचे मोठे दुर्दैव आहे. जोपर्यंत राजकीय नेतृत्व स्वतःहून राजीनामा देऊन जबाबदारी स्वीकारत नाही, तोपर्यंत नोकरशाहीवर आणि परीक्षा हाताळणाऱ्या प्रशासनावर कोणताही दबाव निर्माण होणार नाही. राजकारणी केवळ चौकशांचे आणि आश्वासनांचे गाजर दाखवून वेळ मारून नेण्यात पटाईत झाले आहेत. आज गरज आहे ती या संपूर्ण परीक्षा पद्धतीचे 'सॅनिटायझेशन'करण्याची. पेपर फोडणाऱ्या गुन्हेगारांना आणि त्यांना पाठीशी घालणाऱ्या अधिकाऱ्यांना थेट तुरुंगाची हवा दाखवली पाहिजे. जर या 'पेपर फुटीच्या कोरोना'वर तातडीने आणि कठोर 'लस' शोधली नाही, तर देशातील तरुण पिढीचा व्यवस्थेवरचा विश्वास कायमचा उडेल आणि अराजकतेची नवी लाट निर्माण होईल, यात शंका नाही!

# स्वयंघोषित पदाधिकारी लोकमान्य होत नाहीत

आजच्या काळात समाजात विविध सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, शैक्षणिक आणि राजकीय स्वरूपाच्या असंख्य संस्था, संघटना आणि मंच निर्माण होत आहेत. त्यापैकी काही शासनमान्य आणि विधिवत नोंदणीकृत असतात, तर काही केवळ नावापुरत्या अस्तित्वात असतात. संस्था निर्माण होणे ही लोकशाहीसाठी सकारात्मक बाब आहे; कारण त्यातून समाजकार्याची नवी दालने उघडू शकतात. मात्र या प्रक्रियेत एक चिंताजनक प्रवृत्तीही वाढताना दिसते. ती म्हणजे स्वयंघोषित पदाधिकाऱ्यांची.




आज अनेक ठिकाणी काही व्यक्ती स्वतःलाच अध्यक्ष, संस्थापक, राष्ट्रीय अध्यक्ष, प्रदेशाध्यक्ष, कार्याध्यक्ष, मुख्य समन्वयक अशा मोठमोठ्या पदव्या देऊन समाजात वावरताना दिसतात. त्या पदांना कोणतीही लोकशाही प्रक्रिया, निवडणूक किंवा संस्थात्मक मान्यता नसते. काही वेळा संस्था म्हणजे केवळ नावापुरती असते आणि पदाधिकारी मात्र डझनभर असतात. त्यामुळे अशा पदांचा समाजातील विश्वास कमी होत चालला आहे. काही ठिकाणी तर एकाच कुटुंबातील व्यक्ती विविध पदांवर विराजमान झालेल्या दिसतात. अध्यक्ष वडील, उपाध्यक्ष मुलगा, सचिव भाऊ, कोषाध्यक्ष पत्नी, संघटक पुतण्या अशा स्वरूपाची रचना असते. समाजातील इतर कार्यकर्त्यांना संधी मिळावी, नवे नेतृत्व तयार व्हावे, लोकशाही पद्धतीने निर्णय व्हावेत, हा विचार दुय्यम ठरतो. पद हे समाजसेवेचे साधन न राहता ते प्रतिष्ठेचे प्रतीक बनते.प्रत्यक्षात कोणतेही पद व्यक्तीला मोठे बनवत नाही. उलट व्यक्तीच्या कार्यामुळे पदाला प्रतिष्ठा प्राप्त होते. इतिहासात अनेक अशी उदाहरणे आहेत की ज्यांनी कोणतेही पद नसताना समाजमन जिंकले. लोकांनी त्यांना आदर दिला तो त्यांच्या कार्यामुळे, प्रामाणिकपणामुळे आणि त्यागामुळे; पदामुळे नव्हे.आज काही लोकांचा भर समाजकार्यात कमी आणि प्रसिद्धीवर अधिक असल्याचे दिसून येते. एखाद्या मोठ्या नेत्यासोबत छायाचित्र काढणे, सोशल मीडियावर मोठ्या पदव्या लिहिणे, प्रत्येक कार्यक्रमात सत्कार करून घेणे, शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ स्वीकारणे, सतत स्वतःची घोषणा करून घेणेयातून समाजसेवेपेक्षा प्रतिमानिर्मितीचा प्रयत्न अधिक जाणवतो.

सामाजिक माध्यमांच्या युगात ही प्रवृत्ती अधिक वेगाने वाढली आहे. फेसबुक, व्हॉट्सअॅप, इन्स्टाग्राम किंवा इतर माध्यमांवर मोठमोठे बॅनर, अभिनंदनाचे पोस्टर, वाढदिवसाच्या शुभेच्छांचे फलक आणि पदव्या यांचा अक्षरशः पूर आलेला दिसतो. अनेकदा लोक प्रत्यक्ष कार्यापेक्षा डिजिटल प्रतिमा निर्माण करण्यात अधिक वेळ घालवतात. पण समाज केवळ पोस्टरवर विश्वास ठेवत नाही. तो काम पाहतो.समाजकार्य ही प्रसिद्धीची शर्यत नसून लोकांच्या अडचणी समजून घेण्याची प्रक्रिया आहे. एखाद्या गावात पाणीटंचाई असेल, शाळेची समस्या असेल, रस्त्यांचा प्रश्न असेल, शेतकऱ्यांचे प्रश्न असतील किंवा गरजू विद्यार्थ्यांना मदतीची आवश्यकता असेल, तर त्या प्रश्नांवर सातत्याने काम करणारी व्यक्ती समाजाच्या मनात स्थान निर्माण करते. तिला कोणत्याही पदाची गरज भासत नाही.आज अनेक स्वयंघोषित पदाधिकारी आपल्या संस्थेच्या उद्दिष्टांबाबतही स्पष्ट माहिती देऊ शकत नाहीत. संस्थेची स्थापना का झाली, उद्देश काय आहे, नियमावली काय आहे, सदस्य किती आहेत, आर्थिक व्यवहार कसे होतात, समाजासाठी कोणते उपक्रम राबवले; अशा मूलभूत प्रश्नांची उत्तरे अनेकांकडे नसतात. त्यामुळे संस्था केवळ नावापुरती राहते आणि पदाधिकारीपद हा वैयक्तिक प्रतिष्ठेचा विषय बनतो.लोकमान्यता आणि पदमान्यता यात मोठा फरक आहे. पद मिळवणे सोपे असते; पण लोकांच्या मनात स्थान निर्माण करणे अत्यंत कठीण असते. लोक प्रत्येक व्यक्तीचे वर्तन, बोलणे, चारित्र्य, प्रामाणिकपणा, व्यवहार आणि सातत्याने केलेले कार्य पाहतात. त्यामुळे खऱ्या अर्थाने लोकमान्यता ही वर्षानुवर्षांच्या प्रामाणिक सेवेतून मिळते.



दत्तोपंत डहाळे
नांदेड.

काही व्यक्ती प्रत्येक कार्यक्रमात पहिल्या रांगेत बसण्याचा आग्रह धरतात. व्यासपीठावर जागा मिळावी, नाव पुकारले जावे, सत्कार व्हावा, छायाचित्र वर्तमानपत्रात यावे, ही अपेक्षा असते. परंतु कार्यक्रम संपल्यानंतर समाजाच्या समस्या सोडविण्यासाठी त्याच व्यक्ती क्वचितच पुढे येतात. समाज अशा दिखाऊपणाचा लवकरच अंदाज घेतो.खरे नेतृत्व हे संकटाच्या काळात दिसते. पूर, दुष्काळ, महामारी, अपघात किंवा सामाजिक अडचणीच्या वेळी लोकांच्या मदतीला धावून जाणारी व्यक्ती कोणतेही पद नसतानाही लोकांची नेते बनते. तिच्या मागे लोक स्वतःहून उभे राहतात. त्या नेतृत्वाला कोणत्याही फलकाची किंवा मोठ्या पदवीची गरज नसते.ग्रामीण भागात आजही काही पारंपरिक संबोधनांना महत्त्व दिले जाते. लोक आदराने 'पाटील', 'देशमुख', 'मालक' अशा संबोधनांनी हाक मारतात. मात्र हा आदर केवळ नावामुळे टिकत नाही. व्यक्तीचे वर्तन, समाजातील योगदान आणि चारित्र्य यावरच तो टिकून राहतो. बदलत्या लोकशाही व्यवस्थेत जन्मापेक्षा कर्माला अधिक महत्त्व प्राप्त झाले आहे.आजचा समाज पूर्वीपेक्षा अधिक जागरूक आहे. लोक एखाद्या व्यक्तीचा संपूर्ण प्रवास पाहतात. तिचा सार्वजनिक आणि वैयक्तिक व्यवहार तपासतात. त्यामुळे केवळ मोठे पद लिहिल्याने किंवा सतत प्रसिद्धी मिळवल्याने विश्वास निर्माण होत नाही. विश्वास कमवावा लागतो.

खरी समाजसेवा ही निःस्वार्थ असते. त्यामध्ये प्रसिद्धीपेक्षा जबाबदारी असते. पदापेक्षा कर्तव्य मोठे असते. सेवा, प्रामाणिकपणा, पारदर्शकता आणि सातत्य या चार आधारस्तंभांवरच समाजाचा विश्वास उभा राहतो. त्यामुळे ज्यांना समाजात मानाचे स्थान मिळवायचे आहे त्यांनी पदांच्या मागे धावण्यापेक्षा कार्याच्या मागे धावले पाहिजे.अनेक महान व्यक्तींनी आयुष्यभर कोणत्याही पदाचा मोह ठेवला नाही. त्यांनी समाजासाठी काम केले, लोकांमध्ये राहिले, लोकांच्या दुःखात सहभागी झाले आणि त्यातून त्यांना लोकमान्यता मिळाली. आजही अशा व्यक्तींची नावे आदराने घेतली जातात. कारण त्यांनी पदाची प्रतिष्ठा वाढवली नाही, तर आपल्या कार्याने समाजाची प्रतिष्ठा वाढवली.स्वतःची प्रतिमा कृत्रिमरीत्या निर्माण करता येते; परंतु ती दीर्घकाळ टिकत नाही. समाज शेवटी सत्य ओळखतो. म्हणूनच खऱ्या अर्थाने मोठे व्हायचे असेल तर प्रथम चांगला माणूस बनणे आवश्यक आहे. पद ही तात्पुरती गोष्ट आहे; पण व्यक्तिमत्त्व कायम स्मरणात राहते.प्रत्येकाने आत्मपरीक्षण करण्याची गरज आहे. आपण समाजासाठी नेमके काय केले? आपल्या पदामुळे समाजाला काय लाभ झाला? आपल्या नावामुळे लोकांना विश्वास वाटतो की केवळ प्रसिद्धी? या प्रश्नांची प्रामाणिक उत्तरे प्रत्येकाने स्वतःला द्यावीत.

समाजात प्रतिष्ठा विकत मिळत नाही, ती कमवावी लागते. लोकमान्यता कोणत्याही नियुक्तीपत्राने मिळत नाही; ती लोकांच्या हृदयातून मिळते. म्हणूनच स्वयंघोषित पदांपेक्षा स्वयंप्रेरित समाजसेवा अधिक मोठी आहे.शेवटी एवढेच म्हणावेसे वाटते की आयुष्य फार मौल्यवान आहे. ते केवळ दिखाऊ प्रतिष्ठा, खोटा मान-सन्मान आणि पदांच्या मोहात वाया घालवण्यापेक्षा समाजहितासाठी, स्वतःच्या व्यक्तिमत्त्वाच्या विकासासाठी आणि लोकांच्या विश्वासास पात्र ठरण्यासाठी खर्च केले पाहिजे. कारण पद मिळवणे सहज शक्य असते; पण लोकांच्या मनात कायमचे स्थान मिळवण्यासाठी प्रामाणिकपणा, संयम, त्याग आणि सातत्यपूर्ण कार्य यांना पर्याय नाही.'लोकमान्यता ही कोणत्याही पदापेक्षा श्रेष्ठ असते.' पद संपते, सत्ता बदलते, संस्था बदलतात; पण समाजाच्या मनात निर्माण झालेला विश्वास कायम राहतो. त्यामुळे प्रत्येकाने पदापेक्षा कर्तव्य, प्रसिद्धीपेक्षा सेवा आणि अहंकारापेक्षा माणुसकी यांना प्राधान्य दिले, तर समाज अधिक सुदृढ आणि विश्वासार्ह बनेल.

# शिक्षकाविना शाळांचे झाले हाल; प्रशासनाच्या दिरंगाईचा विद्यार्थ्यांना फटका

## २०० विद्यार्थ्यांवर एकच शिक्षक;त्यालाही बिएलओचे काम,तालुक्यात ८५ शिक्षकांची पदे रिक्त

माहूर/प्रतिनिधी-माहूर तालुक्यातील जिल्हा परिषद शाळांमधील शिक्षकांची कमतरता गंभीर बनली असून त्याचा थेट परिणाम विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर होत आहे. तालुक्यातील १२३ जिल्हा परिषद शाळांमध्ये केवळ २२४ शिक्षक कार्यरत असून तब्बल ८५ पदे रिक्त आहेत. त्यातच ६४ शिक्षकांना बिएलओ (बूथ लेव्हल ऑफिसर) म्हणून निवडणुकीच्या कामावर नियुक्त करण्यात आल्याने ग्रामीण भागातील शिक्षण व्यवस्था अधिकच अडचणीत आली आहे.

तालुक्यातील वानोळा जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेची परिस्थिती सर्वाधिक गंभीर आहे. इयत्ता पहिली ते सातवीपर्यंत सुमारे २०० विद्यार्थी शिक्षण घेत असताना संपूर्ण शाळा केवळ एका शिक्षकावर चालत आहे. त्या एकमेव शिक्षकालाही बिएलओचे काम देण्यात आल्याने विद्यार्थ्यांना शिकविणार कोण, असा प्रश्न पालक व ग्रामस्थ उपस्थित करत आहेत.शिक्षणाचा अधिकार कायदा आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या सरकारी दाव्यांना ही परिस्थिती छेद देणारी असून गावकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी आहे. शिक्षण समितीचे सदस्य व पालकांनी शिक्षक बदली प्रक्रियेत झालेल्या नियोजनाच्या त्रुटींवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. आंतरजिल्हा बदलीने शिक्षकांना कार्यमुक्त करण्यापूर्वी रिक्त जागा भरल्या असत्या, तर ही वेळ आली नसती, असे त्यांचे म्हणणे आहे. सध्या एका शिक्षकाला अनेक वर्गांचा भार सांभाळावा लागत असल्याने काही वर्गांना नियमित अध्यापन मिळत नाही. अशीच परिस्थिती तालुक्यातील अनेक एकशिक्षकी व द्विशिक्षकी शाळांमध्ये असल्याचा आरोप पालकांनी केला आहे. दरम्यान, भारत निवडणूक आयोगाच्या मतदार विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रमासाठी ३० जून ते ३१ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत शिक्षकांना पूर्णवेळ कार्यमुक्त करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. त्यामुळे आधीच शिक्षकांच्या कमतरतेने त्रस्त असलेल्या शाळांमध्ये पुढील चार महिने अध्यापनावर मोठा परिणाम होण्याची शक्यता आहे.ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी रिक्त शिक्षक पदे तातडीने भरावीत,




अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन करावे आणि शाळांमधील अध्यापन सुरळीत ठेवण्यासाठी पर्यायी व्यवस्था करावी, अशी मागणी पालक, ग्रामस्थ व शिक्षणप्रेमींनी प्रशासनाकडे केली आहे.

# छत्रपतींचे कार्य धर्मरक्षक व सर्वव्यापी होते-बालयोगी व्यंकट स्वामी महाराज

## विश्ववंद्य शिवराय प्रतिष्ठानकडून ११ समाजसेवकांचा 'समाजरत्न' पुरस्काराने गौरव




उमरखेड/प्रतिनिधी-छत्रपतींचे कार्य धर्मरक्षक व सर्वव्यापी होते. केवळ नोकरीच्या मागे न लागता व्यापार-उद्योगातही युवकांनी पुढे यावे. जिजाऊंनी शिवरायांना जसे संस्कार दिलेत तसेच संस्कार मुलांवर करावेत. असे विचार बालयोगी व्यंकट स्वामी महाराज यांनी श्री दत्त मंदिर, पिंपळगाव येथील विश्ववंद्य शिवराय प्रतिष्ठानच्या माध्यमातून छत्रपती शिवाजी महाराज राज्याभिषेक सोहळा उत्सव साजरा करतांना व्यक्त केले.

या कार्यक्रमात सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक, सांस्कृतिक व पर्यावरण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या उमरखेड-महागाव परिसरातील ११ व्यक्ती व संस्थांना २० जून रोजी 'समाजरत्न' पुरस्कार देऊन गौरवांकित करण्यात आले. यामध्ये उमरखेड येथील डॉ. यादवराव राऊत, ह.भ.प. तानाजी महाराज, निकिता पुनेश्वर देवकते (करंजी), श्रीराम राजेंद्र सिरसागर (पोफळी), सामूहिक विवाह समिती (कोर्टा), मंगलमूर्ती बचत गट (तरोडा), अनिताताई ठाकरे (करंजखेड), स्वप्नील पामलवाड (साखरा), पांडुरंग पवार (दिघडी), आंबोना कृती तलाव समिती व एक उमरखेड येथील संस्था यांना बालयोगी व्यंकट स्वामी महाराज व प्रतिष्ठानचे अध्यक्ष गजानन शिंदे यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आले. यावेळी आमदार बाबुराव कदम (हदगाव), आमदार किसनराव वानखेडे (उमरखेड), माजी आमदार नामदेवराव ससाने, नितीन भुतडा, प्रशांत राठोड (किनवट), सुरेश जयस्वाल (ढाणकी), अॅड. विलासराव देवसरकर, रमण पाटील रावते यांच्यासह उमरखेड, महागाव, किनवट, हदगाव, तामसा, हिमायतनगर परिसरातील मान्यवरांया उपस्थिती सह शेकडो शिवभक्त उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आशिष विश्वंभरे, प्रस्ताविक सुहास वाघमारे, धर्मध्वज पूजन संकल्पना राजेंद्र जयस्वाल यांनी मांडली तर आभार विष्णू वानखेडे यांनी मानले. पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.

सायंदैनिक नांदेड वार्ता
* संपर्क कार्यालय *
व्ही.डी.देशपांडे भवन, सोमेश कम्पाऊंड, मिलगेट जवळ, नांदेड-१
मुख्यसंपादक-प्रदीप नागापूरकर,भ्रमणध्वनी ९४२२१७४७७४,
सहसंपादक-अविनाश पाटील, भ्रमणध्वनी ९४२१९९०८८
E-mail: nandedwarta@mail.com

# सत्तेत गेलात,आता माहूरला न्याय द्या

## रस्ते,रेल्वे,रोप-वे अन् शक्तिपीठ महामार्ग;माहूरच्या विकासासाठी खासदारांची भूमिका निर्णायक

माहूर/प्रतिनिधी-उबाठा शिवसेनेतून शिंदे शिवसेनेत प्रवेश करत सत्तेच्या केंद्रापर्यंत पोहोचलेल्या हिंगोलीचे खा.नागेश पाटील आष्टीकर यांनी आता पक्षबदलाचा खरा फायदा तीर्थक्षेत्र माहूरच्या विकासासाठी करून दाखवण्याची वेळ आली आहे. सत्ता मिळवणे हे अंतिम ध्येय नसून जनतेच्या प्रश्नांना न्याय मिळवून देणे हीच लोकप्रतिनिधीची खरी कसोटी असते. आज माहूरच्या विकासाशी संबंधित अनेक महत्त्वाकांक्षी प्रकल्प वर्षानुवर्षे रखडले असून, त्यासाठी प्रभावी आणि सातत्यपूर्ण पाठपुरावा करण्याची गरज आहे.

माहूर जवळील मालवाडा घाटातील राष्ट्रीय महामार्ग क्रमांक १६१-ए वरील रस्त्याचे काम मागील तीन वर्षांपासून अर्धवट अवस्थेत पडले आहे. वनविभाग आणि राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणातील वादात सामान्य नागरिक भरडला जात असून दररोज वाहतूक कोंडी, किरकोळ अपघात आणि वादावादीच्या घटना घडत आहेत. हा प्रश्न तातडीने मार्गी लावण्यासाठी केंद्र सरकारकडे प्रभावी पाठपुरावा होणे आवश्यक आहे. माहूर शहरातून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्गाची स्थितीही अत्यंत दयनीय झाली आहे. तीन-चार वर्षांपासून काम सुरू असले तरी फुटपाथ अपूर्ण आहेत, अतिक्रमण कायम आहे आणि नियोजित १०० फूट रुंदीचा रस्ता प्रत्यक्षात अवघ्या ६० फूटांवर आला आहे. लाखो भाविक येणाऱ्या तीर्थक्षेत्रात ही परिस्थिती



प्रशासनाच्या निष्क्रियतेवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारी आहे.आदिलाबादमाहूरपुसदवाशिम रेल्वेमार्गाचा प्रस्ताव तब्बल २२ वर्षांपासून प्रलंबित आहे. साडेतीन शक्तीपीठांपैकी पूर्ण शक्तीपीठ असलेल्या माहूरला आजही रेल्वे सुविधा उपलब्ध नसणे ही दुर्दैवी बाब आहे. संसद आणि रेल्वे मंत्रालय स्तरावर सातत्यपूर्ण पाठपुरावा करून हा प्रकल्प मंजूर करून घेणे ही काळाची गरज आहे. माहूरगड रोप-वे प्रकल्पाचाही गेल्या तीन वर्षांपासून केवळ गाजावाजा झाला; प्रत्यक्षात मात्र एकही पाऊल पुढे पडलेले नाही. रेणुकामाता मंदिर, दत्तशिखर आणि अनसूया माता मंदिराला केबल कारद्वारे जोडण्याचा महत्त्वाकांक्षी आराखडा तयार झाला, ऑस्ट्रियातील तज्ज्ञ कंपनीकडून डीपीआरही तयार करण्यात आला. या प्रकल्पामुळे धार्मिक पर्यटनाला मोठी चालना मिळून स्थानिक युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत. मात्र अद्याप प्रत्यक्ष काम सुरू झालेले नाही. याचबरोबर नागपूर-गोवा शक्तिपीठ महामार्गाच्या सुधारित आराखड्यात माहूरला थेट जोडण्यात आले नाही. शक्तिपीठ महामार्ग असे नाव देऊनही महाराष्ट्रातील प्रमुख शक्तीपीठ असलेल्या माहूरला तब्बल १७ किलोमीटर दूर ठेवण्यात आले आहे. हा अन्याय दूर करून महामार्ग थेट माहूरशी जोडण्यासाठी केंद्र आणि राज्य सरकारकडे प्रभावी पाठपुरावा करण्याची आवश्यकता आहे. आज केंद्रात आणि राज्यात एकाच युतीचे सरकार सत्तेत आहे. त्यामुळे कारणे सांगण्याची वेळ आता संपली असून निकाल दाखवण्याची वेळ आली आहे. पक्षबदलामुळे सत्ता जवळ आली असेल, तर त्या सत्तेचा लाभ सर्वप्रथम तीर्थक्षेत्र माहूरच्या रखडलेल्या विकासकामांना मिळायला हवा. मालवाडा घाट, राष्ट्रीय महामार्ग, रेल्वेमार्ग, रोप-वे आणि शक्तिपीठ महामार्ग असे पाचही महत्त्वाचे विषय मार्गी लावण्यासाठी खा.नागेश पाटील आष्टीकर यांनी पुढाकार घ्यावा, अशी अपेक्षा माहूरगडावर येणारे लाखो भाविक आणि स्थानिक नागरिक व्यक्त करत आहेत.

## तख्त सचखंड गुरुद्वारात केंद्रीय मंत्री चिराग पासवान यांनी घेतले दर्शन

नांदेड/प्रतिनिधी-केंद्रीय अन्न प्रक्रिया उद्योग मंत्री चिराग पासवान यांनी नांदेड येथील दौऱ्यात सुप्रसिद्ध श्री हजूर साहिब सचखंड गुरुद्वारास भेट देवून दर्शन घेतले. यावेळी गुरुद्वाराचे पुजारी यांच्या हस्ते त्यांचा सन्मान करण्यात आला. त्यांच्यासोबत त्यांचे कुटूंबिय यांची उपस्थिती होती.

यावेळी उपविभागीय अधिकारी डॉ.सचिन खल्लाळ, तहसिलदार संजय वारकड, जिल्हा कृषी अधीकारी दत्तकुमार कळसाईत, एमआयडीसी मॅनेजर



गजानन कपाळे आदीची उपस्थिती होती. यावेळी केंद्रीय मंत्री चिराग पासवान यांनी तख्त सचखंड श्री हुजूर साहिब गुरुद्वारात लंगर प्रसाद घेवून सेवा केली.

## शाळेच्या दर्शनी भागात शैक्षणिक शुल्का बाबत माहिती देणारे फलक सर्व शाळांनी लावावेत-जिल्हाधिकारी राहूल कर्डिले

नांदेड/प्रतिनिधी-मागील काही दिवसांपासून जिल्हयातील इंग्रजी माध्यमाच्या व मराठी माध्यमाच्या स्वयंअर्थसहायित तत्वावर चालणाऱ्या शाळांच्या बाबतीत शैक्षणिक शुल्क व शालेय गणवेश आणि पुस्तके खरेदीसाठी बऱ्याच तक्रारी प्राप्त होत आहेत. त्यामुळे नांदेड जिल्हयातील स्वयंअर्थसहायित तत्वावर चालणाऱ्या सर्व शाळांनी महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियमन) अधिनियम-२०११ मध्ये दिलेल्या सूचनेनुसार कार्यकारी समितीचे गठण करुन कार्यकारी समितीच्या बैठकीमध्ये सर्व वर्गांची शैक्षणिक शुल्क निश्चीती करण्यात यावी व अशा आशयाचे फलक सर्वांना दिसेल अशा ठिकाणी शाळेच्या दर्शनी भागात लावण्याच्या सूचना जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी दिल्या आहेत.

तसेच याबाबतीत सर्व शाळा व्यवस्थापन अनुपालन करत आहेत किंवा नाही यावर नजर ठेवण्यासाठी सर्व गटशिक्षणाधिकारी व शिक्षणाधिकारी यांना सूचना दिल्या आहेत. शाळा व्यवस्थापनाने विदयार्थ्यांना स्कुल युनीफॉर्म,स्कुलबॅग, स्कुल शूज तसेच पुस्तके इत्यादि शाळेतून अथवा ठराविक दुकानातून खरेदी करण्याची सक्ती करु नये. स्वयंअर्थसहायित शाळा ज्या मंडळाशी संलग्नित आहेत, त्या मंडळाच्या अधिकृत पुस्तकांचा वापर शाळेच्या दैनंदिन अध्ययन अध्यापनात करावा. इतर प्रकाशनाची पुस्तके वापरू नयेत. तसेच त्यांच्या खरेदीचा आग्रह पालकांना करु नये. वरील सूचनांचे अनुपालन करुन जिल्हयातील स्वयंअर्थसहायित तत्वावर चालणाऱ्या इंग्रजी, मराठी व इतर सर्व माध्यमाच्या व व्यवस्थापनाच्या शाळांनी शाळेच्या दर्शनी भागामध्ये पुढील प्रमाणे फलक लावावा. सदर फलकामध्ये संस्थेचे नाव, शाळेचे नांव पुर्ण पत्यासह, युडायस क्रमांक, परीक्षा मंडळाचे नांव व मंडळ संकेतांक क्रमांक, शाळेचा शासन मान्यता आदेश, मान्य वर्ग पासून पर्यंत, वर्गनिहाय कार्यकारी समितीने निश्चीत केलेली वार्षिक शैक्षणिक शुल्क दर याप्रमाणे फलक लावून त्याच्या फोटोसह अहवाल गटशिक्षणाधिकारी यांचे मार्फत शिक्षणाधिकारी यांचे कार्यालयास सादर करावा, अशी सूचना जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी जिल्हयातील सर्व शाळांना आज दिली आहे.

## मरखेल येथील सरस्वती बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या विद्यालयाचे तालुक्यात उत्कृष्ट कार्य

देगलूर/प्रतिनिधी-देगलूर तालुक्यातील मरखेल येथील सरस्वती बहुउद्देशीय सेवाभावी संस्था गोजेगाव द्वारा संचलित या द्वारे चालणाऱ्या विविध महाविद्यालय, शाळा, हायस्कूल या शाळेची देगलूर तालुक्यामध्ये नाव लौकिक झालेले आहे.

मरखेल येथील सरस्वती बहुउद्देशीय सेवाभावी संस्था गोजेगाव द्वारा संचलित स्थापन करण्यात आलेल्या बी फार्मसी, ग्री, शाळा, हायस्कूल व इतर शैक्षणिक सुविधा येथे चांगल्या प्रकारे उपलब्ध असल्यामुळे देगलूर तालुका व इतर जिल्ह्यातील तसेच कर्नाटक, तेलंगणा या राज्यातून विद्यार्थी येथे शिक्षण घेऊन अनेक मोठ्या पदावर नोकरी करत आहेत. गेल्यावर्षी मार्च महिन्यात नरेंद्राचार्य महाराज यांनी या महाविद्यालयास भेट देऊन व्यंकटराव पाटील गोजेगावकर यांना शैक्षणिक विकास रत्न पुरस्कार देऊन मी येत्या काळामध्ये त्यांचा गौरव करीन असे उद्गार मरखेल येथील महाविद्यालय झालेल्या



कार्यक्रमांमध्ये उल्लेख केला आहे. यांचे येथील कॉलेज व महाविद्यालयात गोरगरिबांच्या विद्यार्थ्यांना विनामूल्य प्रवेश देऊन त्यांचे शिक्षण पूर्ण केले जाते. माजी जिल्हा परिषद शिक्षण सभापती व्यंकटराव पाटील यांच्या या शैक्षणिक सुविधेमुळे मरखेल या गावाला नावलौकिक झाले आहे. मात्र काही कार्यकर्ते जाणून बुजून त्यांच्याविरुद्ध व त्यांच्या महाविद्यालयाच्या, शाळा, विद्यालय यांच्याविरुद्ध कॉलेजची व विद्यालयाची बदनामी करण्यासाठी अनेक वेळा तक्रारी देण्यात आले, मात्र या तक्रारी मध्ये कोणतीही दोष व त्रुटी आढळून आले नाहीत. मात्र या तक्रारीमुळे काही झाले नाही फक्त विद्यालयाची नाव बदनाम करण्याचे काम झाले आहे. कोणतेही नागरिक व गोरगरीब जनता या भागातील कोणती शैक्षणिक व राजकीय कोणतीही सामाजिक समस्या असली तरी त्यांनी तातडीने त्या व्यक्तीची दखल घेऊन वरिष्ठ अधिकाऱ्यांना कोणत्याही गोरगरिबाची लवकरात लवकर कामे करण्यासाठी मदत करतात म्हणून त्यांचे या तालुक्यात एक शैक्षणिक क्षेत्रात त्यांचे मोठे योगदान आहे. त्यांच्या या कार्याबद्दल तालुक्यातून त्यांच्यावर अभिनंदनचा वर्षाव होत आहे.

## जिल्हा बँक निवडणुकीत उमरीतून कैलास गोरठेकर पुन्हा रिंगणात

उमरी/प्रतिनिधी-नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या पंचवार्षिक निवडणुकी-साठी उमरी मतदारसंघातून उमरी नगर परिषदेचे उपनगराध्यक्ष कैलास देशमुख गोरठेकर हे मंगळवार, दि.३० जून रोजी आपला उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत.

उमरी तालुक्यात सहकार क्षेत्रात गोरठेकर कुटुंबाची अनेक वर्षांची परंपरा असून शेतकरी, सभासद आणि सर्वसामान्य नागरिकांशी त्यांचा सातत्यपूर्ण संपर्क राहिला आहे. नगर परिषदेच्या माध्यमातून विविध



विकासकामे राबविताना मिळालेला अनुभव तसेच सहकार क्षेत्रातील सक्रिय कार्यामुळे कैलास गोरठेकर यांच्याविषयी कार्यकर्ते व सभासदांमध्ये सकारात्मक वातावरण निर्माण झाले आहे. मागील पाच वर्षांच्या संचालकपदाच्या कार्यकाळात कैलास देशमुख गोरठेकर यांनी शेतकरी, सभासद आणि सहकारी संस्थांच्या विविध प्रश्नांवर जिल्हा बँकेच्या स्तरावर सातत्याने आवाज उठवून त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले. दरम्यान, जिल्हा बँकेच्या २३ जागांसाठी २६ जुलै रोजी मतदान होणार आहे. उमरी तालुक्यातील विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांच्या मतांवर या निवडणुकीचे गणित मोठ्या प्रमाणात अवलंबून असल्याने कैलास देशमुख गोरठेकर यांच्या उमेदवारीने निवडणुकीत चांगलीच रंगत निर्माण झाली आहे.

## रेती वाहतूक करणारे टिप्पर पोलीसांनी पकडले

नांदेड/प्रतिनिधी-अवैधरित्या रेती वाहतूक करणारे टिप्पर रविवारी रात्री उमरी पोलीसांनी कौडगाव ते बळेगाव रस्त्यावर पकडले आहे.

उमरी पोलीस स्टेशनचे पोलीस निरिक्षक जयप्रकाश गुट्टे व पोलीस कर्मचारी हे रविवारी रात्री गस्त घालीत असतांना मौजे कौडगाव ते बळेगाव रस्त्यावर अवैधरित्या रेती वाहतूक करणारे टिप्पर क्र.एमएच २६ एडी-९३५५ हे निदर्शनास आले. पोलीसांनी टिप्पर थांबवून तपासणी केली असता त्यामध्ये दोन ब्रास रेती आढळून आली. पोलीसांनी रेती व टिप्पर असा ६ लाख रुपयांचा ऐवज जप्त केला आहे.

## १ जुलै रोजी जिल्हा परिषदेत कृषी दिनाचे आयोजन

नांदेड/प्रतिनिधी-माजी मुख्यमंत्री कै.वसंतराव नाईक यांनी कृषिक्षेत्रात केलेल्या भरीव योगदानाबद्दल १ जुलै हा दिवस त्यांचा वाढदिवस राज्यात कृषिदिन म्हणून साजरा करण्यात येतो. यावर्षी १ जुलै २०२६ रोजी जिल्हा परिषदेच्या कृषि विभागामार्फत कृषिदिन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक संदीप माळोदे यांच्या अध्यक्षतेखाली कै. यशवंतराव चव्हाण सभागृह, जिल्हा परिषद, नांदेड येथे साजरा करण्यात येणार आहे.

या कार्यक्रमात सेंद्रीय शेती करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रमाणपत्र वाटप करण्यात येणार आहेत. या कार्यक्रमासाठी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, विद्यापीठ शास्त्रज्ञ, जिल्हा परिषदेचे अधिकारी व कर्मचारी, कृषी विभाग महाराष्ट्र शासन, आत्मा नांदेडचे सर्व अधिकारी व कर्मचारी तसेच जिल्ह्यातील राज्य पुरस्कार प्राप्त शेतकरी, शेती क्षेत्रात उल्लेखनिय काम करणारे शेतकरी व महिला, शेंद्रीय शेती करणारे शेतकरी, माध्यम प्रतिनिधी, पत्रकार यांची उपस्थिती राहणार आहे, असे जिल्हा परिषदेचे कृषी विकास अधिकारी यांनी कळविले आहे.



राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेअंतर्गत शेवडी (बा.) येथील आरोग्य उपकेंद्रात लहान बाळांना डॉ.तृप्ती वटमे (बावगे) यांच्या हस्ते डोस पाजला आहे. यावेळी आशा गोडबोले व इतर उपस्थित होते.


**तालुका दंडाधिकारी तथा तहसीलदार कंधार यांचे कार्यालय**

Email Id:tahkadhar@gmail.com जा.क्रं.२०२६/ज.मृ.नो./कावी

दुरध्वनी क्र.२२३-०२४६६ दिनांक - ०५/०६/२०२६

**(जन्म मृत्यू शाखा)**

**जाहीर प्रगटन**

याद्वारे प्रगटन देण्यात येते की अर्जदार सुषेन कृष्णदास गुटे रा.घागरदरा ता.कंधार जि.नांदेड यांनी या कार्यालयात त्यांचा ईश्वरी सुषेन गुटे रा.घागरदरा ता.कंधार जि.नांदेड यांचे जन्म/मृत्यू प्रमाणपत्र मिळण्यासाठी आदेश होण्याकरिता मागणी केली आहे.

जन्म/मृत्यू झालेल्यांचे नाव/ ईश्वरी सुषेन गुटे रा.घागरदरा ता.कंधार या ठिकाणी दिनांक २०/०८/२०२१ या दिवशी जन्म/मृत्यू झाला असून प्रमाणपत्र मिळण्याकरिता आदेश होणे करिता सदर तहसील कार्यालय कंधार येथे दिनांक ०२/०६/२०२६ रोजी अर्ज सादर केला आहे.

वरील जन्म /मृत्यू दिनांक बाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झालेपासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप तहसील कार्यालय कंधार येथे सादर करावा. दिलेल्या मुदतीनंतर आक्षेपाचा विचार केला जाणार नाही.

दिनांक :- ०५/०६/२०२६

स्थळ - कंधार

स्वाक्षरित/-
तहसीलदार कंधार

**तालुका दंडाधिकारी तथा तहसीलदार कंधार यांचे कार्यालय**

Email Id:tahkadhar@gmail.com जा.क्रं.२०२५/ज.मृ.नो./कावी

दुरध्वनी क्र.२२३१००-०२४६६ दिनांक - १८/०३/२०२६

**(जन्म मृत्यू शाखा)**

**जाहीर प्रगटन**

याद्वारे प्रगटन देण्यात येते की अर्जदार राठोड राजेश रतन रा.मानसिंगवाडी ता.कंधार जि.नांदेड यांनी या कार्यालयात त्यांचा राठोड शिवम राजेश रा.मानसिंगवाडी ता.कंधार जि.नांदेड यांचे जन्म/मृत्यू प्रमाणपत्र मिळण्यासाठी आदेश होण्याकरिता मागणी केली आहे.

जन्म/मृत्यू झालेल्यांचे नाव/ राठोड शिवम राजेश सदर व्यक्तीचा रा.मानसिंगवाडी ता.कंधार या ठिकाणी दिनांक ०८/०६/२००७ या दिवशी जन्म/मृत्यू झाला असून प्रमाणपत्र मिळण्याकरिता आदेश होणे करिता सदर तहसील कार्यालय कंधार येथे दिनांक १६/३/२०२६ रोजी अर्ज सादर केला आहे.

वरील जन्म /मृत्यू दिनांक बाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झालेपासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप तहसील कार्यालय कंधार येथे सादर करावा. दिलेल्या मुदतीनंतर आक्षेपाचा विचार केला जाणार नाही.

दिनांक :- १८/०३/२०२६

स्थळ - कंधार

स्वाक्षरित/-
तहसीलदार कंधार

CHANGE IN NAME

My (old name) is **SHAIKH PARVEZ** which now I am, changing as (new name) **SHAIKH PARVEZ MAINODDIN**

Hence, forth my all correspondance will be done as per my new name. please consider the same.

Address
230 Shivray Nagar Malegao Road
Nanded 431605
M No-7776894380

CHANGE IN NAME

My (old name) is **SHAIKH MUJIB** which now I am, changing as (new name) **SHAIKH MUJEEB SHAIKH MANNAN**

Hence, forth my all correspondance will be done as per my new name. please consider the same.

Sign by
**SHAIKH MUJEEB SHAIKH MANNAN**
R/o H.no.2-4-156 Pakki chall NTC Mill Area
Nanded-431601
M.No.-9822664440

CHANGE IN NAME

My (old name) is **FAROOQUI FARHEENATAJ MDBADRUDDIN** which now I am, changing as (new name) **FARHEENA IMRAN SHAIKH**

Hence, forth my all correspondance will be done as per my new name. please consider the same.

Sign by
**FARHEENA IMRAN SHAIKH**
R/o Sarafa chowk bazar Itwara Nanded-431604
M.No.-9860316374

# भूमी अभिलेख उपअधीक्षक कार्यालयाची इमारत पाडणारे भूखंड माफिया अद्यापही मोकाट

किनवट/प्रतिनिधी- बहूचर्चीत झालेल्या भूमी अभिलेख उपअधीक्षक कार्यालयाची इमारत नेस्तनाबूत केल्याप्रकरणी १५ जून रोजी उपअधीक्षक महेंद्र गंबरेंनी किनवट पोलीसात तक्रार दाखल केली. पंधरावाडा लोटल्यानंतरही गुन्ह्यातील अज्ञातांपर्यंत पोलीस तपास पोहोचला की नाही याबद्दलची स्पष्टता समोर आलेली नाही. इमारत भूईसपाट करण्यामागे कोणाचा हात असेल यापेक्षा पाच गुंठे भूखंड बळकावण्याचाच प्रयत्न होता का? याबद्दल तर्कवितर्कांनि जोर धरलाय. आतातरी उपअधीक्षकांनी सभोवताल कम्पाउड करून भूखंड सुरक्षित ठेवण्यासाठी ठोस पाऊल उचलण्याची मागणी करण्यात आली आहे.

इमारत नेस्तनाबूत केली इथेच प्रकरण थांबणार नाही. पोलीस तपासातून इमारत पाडण्यामागे कोणाचा हात आहे? इमारत पाडण्याचा उदेश काय? जाणीवपूर्वक ज्या मशिनने इमारत भूईसपाट केली त्या मशिनचा शोध घ्यावा लागणार आहे. इमारत पाडल्यानंतरही भूमी अभिलेख विभागाला खबरच नव्हती वृत्तपत्रातील बातम्यानंतर किनवट प्रशासन खडबडून जागे होऊन जायमोका चौकशी अहवालासह १५ जून रोजी किनवट पोलीसात



तक्रार दाखल केली. इमारत पाडण्यामागे बड्याबड्यांचा हात असण्याच्या शक्यता बळावतांना दिसतात. इमारत पाडून भूखंडावर ताव मारण्याच्या उद्देशाने शासकीय इमारत भूईसपाट केली असावी हे सांगण्यासाठी ज्योतिषकाराची गरज पडणार नाही, ते अगदी सुर्य प्रकाशाएवढे स्पष्ट दिसते. इमारतीच्या दारं, खिडक्या कुठे आहेत? लोहलोखंड कोणत्या भंगार व्यवसाईकाला विकले? इथपर्यंत पोलीस तपास पोहोचल्या नंतर अज्ञातांची चेहरे सर्वांच्या समोर येणार असल्याने या प्रकरणाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. सत्तावीस वर्षापूर्वीची भूमी अभिलेख कार्यालयाची इमारत होती. मुळात शहराच्या बाहेर नाल्याच्या कडेला अडचणीचा रस्ता असा भूमी अभिलेख कार्यालयाला भूखंड घेण्यापासून ते इमारत पाडेपर्यंतच्या इतिहास खंगाळावा लागणार आहे. मानववस्ती नसलेली पुरबाधित जमीन भूमी अभिलेख कार्यालयासाठी १९९७ मध्ये ५ गुंठे भूखंड ७५ लाख रुपयाच्या आसपास खरेदी केला. परंतु प्रत्यक्ष व्यवहारातील तथ्यतेविषयी वेगळीच चर्चा ऐकायला मिळते. याबद्दल प्रकरणाच्या मुळात जाऊन माहिती मिळवण्याचा प्रयत्न केला मात्र माहिती मिळू शकली नाही. भूमी अभिलेख उपाधीक्षक महेंद्र गंबरे यांनी प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीसात तक्रार दिलीय. आज ना उद्या इमारतीचा पाडेकरी आणि भूखंडाचा स्वाहाकारी पोलीसांच्या तावडीत सापडणार हे उल्लेखनीय म्हणता येईल. हा भूखंड वाचवायचा असेल तर उपअधीक्षक महेंद्र गंबरे यांनी तात्काळ सिमांकन करून कब्जा करणे आवश्यक असल्याचे बोलल्या जात आहे.

पान १ वरुन

## विधान परिषद...

डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या विधान परिषद सदस्यत्वाची मुदत संपल्यानंतर उपसभापतीपद रिक्त झाले होते. मात्र, नुकत्याच झालेल्या विधान परिषद निवडणुकीत त्या बिनविरोध निवडून आल्याने त्यांच्याकडे पुन्हा उपसभापती पदाची धुरा सोपविण्याची शक्यता अधिक बळावली आहे.महायुतीतील सत्तासमीकरणाचा विचार करता, विधान परिषद सभापती आणि विधानसभा अध्यक्ष ही दोन्ही पदे भाजपकडे आहेत, तर विधानसभेचे उपाध्यक्षपद राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) यांच्याकडे आहे. त्यामुळे समतोल राखण्यासाठी विधान परिषदेचे उपसभापतीपद शिवसेना (शिंदे गट)कडेच राहण्याची शक्यता असून, डॉ. नीलम गोऱ्हे यांचे नाव सर्वाधिक चर्चेत आहे.

# पत्रकारांना कथित शिवीगाळ व धमकी प्रकरणी खा.संजय दिना पाटील यांच्यावर कारवाईची मागणी

माहूर/प्रतिनिधी-पत्रकारांशी कथित शिवीगाळ, धमकी व अर्वाच्य भाषा वापरल्याचा आरोप करत खासदार संजय दिना पाटील यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी मराठी पत्रकार परिषद, तालुका शाखा माहूरच्या वतीने करण्यात आली आहे. यासंदर्भात सोमवारी (दि.२९) तहसीलदार, माहूर यांना निवेदन सादर करण्यात आले.

निवेदनात म्हटले आहे की, लोकशाहीचा चौथा स्तंभ मानल्या जाणाऱ्या पत्रकारांशी अशा प्रकारची कथित वर्तणूक ही अत्यंत निषेधार्ह असून त्यामुळे पत्रकारांच्या सुरक्षिततेसह अभिव्यक्ती स्वातंत्र्याबाबत गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. माहिती मिळविण्यासाठी प्रश्न विचारणाऱ्या पत्रकारांना कथितरित्या अर्वाच्य भाषेत बोलणे, धमकी देणे व दबाव टाकण्याचा प्रयत्न झाल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. मराठी पत्रकार परिषदेने या प्रकरणाची तातडीने सखोल चौकशी करून खासदार संजय दिना पाटील यांच्यावर कायद्यानुसार कठोर कारवाई करावी, अशी मागणी केली आहे. तसेच भविष्यात पत्रकारांवर अशा प्रकारच्या घटना घडू नयेत, यासाठी पत्रकारांच्या सुरक्षिततेची हमी देत आवश्यक



उपाययोजना करण्याची मागणीही प्रशासनाकडे करण्यात आली आहे. हे निवेदन मराठी पत्रकार परिषद, तालुका शाखा माहूरचे अध्यक्ष सरफराज दोसानी यांच्या नेतृत्वाखाली सचिव राजकुमार पडलवार, जिल्हा कार्यकारिणी सदस्य जयकुमार अडकीने, राज ठाकूर, गजानन भारती, बालाजी कोंडे, सिद्धार्थ तामगाडगे, सुभाष खडसे, अजय कँधारे, अमजद खान हैदर खान, विश्वास पंडागळे, अरुण पवार, अमजद खान, जावेद, प्रा. प्रवीण बिरादार, कैलास बेहेर,राज किरण देशमुख आदींच्या स्वाक्षरीने तहसीलदारांकडे सादर करण्यात आले.

# अन्नसुरक्षेच्या नियमांचा फक्त गाजावाजा नको;कठोर अंमलबजावणी हवी

देगलूर/प्रतिनिधी-देगलूर शहर व परिसरातील अनेक हॉटेल्स, उपहारगृहे आणि खाद्यपदार्थ विक्री केंद्रांमध्ये अस्वच्छता, शिळ्या पदार्थांची विक्री, तसेच वर्तमानपत्राच्या कागदावर खाद्यपदार्थ देण्याचे प्रकार समोर येत आहेत. हे केवळ अन्नसुरक्षा नियमांचे उल्लंघन नसून नागरिकांच्या आरोग्याशी थेट खेळ आहे.

वर्तमानपत्राच्या शाईतील रासायनिक घटक आरोग्यासाठी घातक असल्याचे तज्ज्ञ वारंवार सांगत असतानाही काही व्यावसायिक नफ्याच्या हव्यासापोटी नियमांना केराची टोपली दाखवत आहेत. अन्न व औषध प्रशासनाने अलीकडेच राज्यभर धडक कारवाया सुरू केल्या असल्या तरी त्या सातत्यपूर्ण आणि परिणामकारक होणे अधिक महत्त्वाचे आहे. केवळ एक-दोन दिवसांची तपासणी करून कारवाईचा धाक निर्माण होत नाही. नियम मोडणाऱ्यांवर दंडात्मक कारवाईबरोबरच परवाने निलंबित करण्यासारखे कठोर निर्णय घेतल्यासच परिस्थितीत सुधारणा होईल.अन्न म्हणजे आरोग्याचा पाया. त्यामुळे ग्राहकांनीही स्वच्छतेबाबत जागरूक राहून संशयास्पद ठिकाणी अन्न सेवन टाळावे आणि गैरप्रकार आढळल्यास प्रशासनाकडे तक्रार करावी. नागरिकांची जागरूकता आणि प्रशासनाची कठोर अंमलबजावणी यांची सांगड घातली तरच देगलूरकरांना सुरक्षित, स्वच्छ आणि दर्जेदार अन्न मिळू शकेल. अन्यथा अन्नसुरक्षेचे नियम कागदावरच राहतील आणि नागरिकांच्या आरोग्याशी खेळ सुरूच राहील.



शासनाने प्रस्तावित केलेल्या तख्त सचखंड श्री हुजुर साहिब गुरुद्वारा बोर्ड कायदा रद्द करुन गुरुद्वारा अधिनियम १९५६ ॲक्ट हा जुनाच कायदा कायम ठेवावा अशी मागणी आ. आनंदराव बोंढारकर यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची विधानभवनात भेट घेवून निवेदनाद्वारे केली आहे.

# हदगाव तालुका किनवटमध्ये समाविष्ट करण्या संदर्भात काही नेत्यांचे मौन

**शेख चांदपाशा**

हदगांव-हदगाव विधानसभा क्षेत्रात सध्या सर्वसामान्य जनता शेतकरी मूलभूत समस्यांच्या गर्तेत अडकले असताना, तालुक्यातील काही राजकीय पक्षांचे 'जबाबदार' पदाधिकारी मात्र जनतेचे प्रश्न सोडवण्या ऐवजी आपल्या बड्या नेत्यांसोबत 'रिल्स' आणि 'व्हिडिओ' बनवण्यातच मग्न असल्याचे धक्कादायक चित्र पाहायला मिळत आहे. हदगाव तालुक्याचा किनवट येथे अतिरिक्त जिल्हाधिकारी कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात समावेषा संदर्भात काही नेत्यांनी मौन पाळले आहे.

सध्या हदगाव तालुक्यात शेतकऱ्यांचे प्रश्न, रखडलेली विकासकामे, ग्रामीण भागातील रस्त्यांची झालेली दुरवस्था, विविध प्रशासकीय कार्यालयामध्ये अधिकारी कर्मचाऱ्यांची दुर्लक्षपणामुळे कामे रखडली असून आणि युवकांचा रोजगाराचा मुद्दा अत्यंत गंभीर बनला आहे. हक्काच्या कामासाठी जनता लोकप्रतिनिधी आणि विविध पक्षाच्या जबाबदार कार्यकर्त पदाधिकाऱ्यांकडे डोळे लावून बसली आहे. सध्या स्थितीला हदगांव व हिमायतनगर तालुका नव्याने अप्पर जिल्हाधिकारी कार्यालय स्थापन करण्यात येणाऱ्या असुन ते किनवट तालुक्याला जोडण्यात येत आहे. यासंबंधी प्रशासानाकडून हरकती सूचना नागरिकांकडून मागविण्यात येत आहे. याबाबतीत हे जबाबदार विविध पक्षाचे पदाधिकारी जनतेमध्ये जाऊन जनजागृती का? करत नाहीत असा संतप्त सवाल करण्यात येत आहे. आणखीन विशेष म्हणजे वर्धा-नांदेड हे रेल्वेच्या प्रकल्पाच्या संदर्भात त्याचे रेल्वेस्टेशन हदगाव शहरा पासून किती अंतरावर कुठे करण्यात येत आहे. याबाबतही कोणताही पदाधिकारी किवा राजकीय नेता तोंड उघडत नाही. परंतु जनतेच्या या गंभीर समस्यांवर आवाज उठवण्या ऐवजी, तालुक्यातील काही राजकीय पक्षाचे तथाकथित पदाधिकारी मुंबई किंवा जिल्ह्याच्या ठिकाणी जाऊन आपल्या पक्षाच्या बड्या नेत्यांच्या अवतीभवती घुटमळताना दिसत आहेत. नेत्यांसोबतची उठबस, पाठीवर पडलेली कौतुकाची थाप आणि बॅकग्राउंडला गाणे लावून बनवलेले रिल्स एवढ्यापुरतीच या पदाधिकाऱ्यांची कार्यक्षमता मर्यादित राहिली आहे की काय असा खोचक सवाल आता नागरिक करित आहे. तालुक्यात सामन्य नागरिक महगाई ने व शेतकरी अडचणीत आहेत. नवीन रस्त्यांच्या निकृष्ट कामांकडे ह्या पदाधिकाऱ्यांचे कमालीचे दुर्लक्ष करीत आहेत. चमकोगिरी करणाऱ्या पदाधिकाऱ्यांना पक्षातील वरिष्ठ नेते तरी जाब विचारणार का, हा मोठा प्रश्न आहे. जर जनसामान्यांच्या प्रश्नांकडे अशीच डोळेझाक करून फक्त डिजिटल प्रसिद्धीलाच महत्त्व दिले गेले, तर आगामी निवडणुकीत जनताच या 'रिल्स बहाद्दर' नेत्यांची 'रीळ' कायमची गुंडाळल्या शिवाय राहणार नाही, असा सुप्त सूर मतदार संघातून उमटत आहे हे उत्खनिय आहे..

# वटपौर्णिमेनिमित्त महिलांनी वडाची पूजा करुन अखंड सौभाग्याची केली प्रार्थना

नायगाव/प्रतिनिधी- वटपौर्णिमेचा पवित्र सण नरसी येथील राणी लक्ष्मीबाई हायस्कूल परिसरात श्रद्धा, भक्ती आणि पारंपरिक उत्साहात साजरा करण्यात आला. शाळेच्या परिसरातील वडाच्या झाडाजवळ विवाहित महिलांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून विधिवत वडाचे पूजन केले.

हिंदू परंपरेनुसार वटपौर्णिमा हा विवाहित महिलांसाठी अत्यंत महत्त्वाचा सण मानला जातो. यानिमित्त महिलांनी वडाच्या झाडाला हळद, कुंकू, फुले, अक्षता अर्पण करून पूजा केली. त्यानंतर वडाच्या झाडाभोवती पवित्र धागा गुंडाळत पतीला उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य, अखंड सौभाग्य लाभावे तसेच सात जन्म हाच पती लाभावा अशी मनोभावे प्रार्थना केली. यावेळी महिलांनी वटसावित्रीचे व्रत विधीवत पार पाडत सावित्रीसत्यवानाच्या कथेचे श्रवण केले. पारंपरिक वेशभूषेत सहभागी झालेल्या महिलांमुळे परिसरात धार्मिक व मंगलमय वातावरण निर्माण झाले होते. या प्रसंगी राणी लक्ष्मीबाई हायस्कूलच्या प्राचार्या अनिताताई चोंडीकर, सुलोचना पाटोदे, औरादे मॅडम, कुलकर्णी मॅडम, प्रेमालाताई नंदगावकर, नंदाताई कस्तुरे, जयश्री कँदूरके, संगीता जाधव मॅडम, शिवकांता बिरादार, मीरा पांचाळ, मुंडकर ताई, गेटकेवार ताई, ईश्वरीताई भवरे, अनुराधाताई सेटकर तसेच इतर महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.



पान १ वरुन

## नसरापूर बालिका हत्या...

भाजप नेत्या चित्रा वाघ यांनी ही शिक्षा केवळ एका आरोपीसाठी नसून समाजातील विकृत मानसिकतेच्या गुन्हेगारांसाठी इशारा असल्याचे सांगितले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्य सरकारने अवलंबलेल्या 'झिरो टॉलरन्स' धोरणामुळे आणि फास्ट ट्रॅक न्यायप्रक्रियेमुळे या प्रकरणात पीडितेला लवकर न्याय मिळाल्याचे त्यांनी म्हटले. तसेच अत्याधुनिक न्यायवैद्यक तपास आणि भक्कम पुराव्यांमुळे दोषींना कठोर शिक्षा होऊ लागल्याने कायद्याचा धाक अधिक वाढेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

## माहूर पोलिस वसाहतीची...

पोलिसांच्या सन्मान, सुरक्षितता आणि शासनाच्या संवेदनशीलतेची परीक्षा ठरला आहे. प्रशासनाने तातडीने नव्या वसाहतीचे काम सुरू करून पोलिस कुटुंबांना सुरक्षित निवारा उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी होत आहे.

# युवकांचे स्थलांतर रोखण्यासाठी उमरखेडमध्ये मोठा उद्योग उभारा:आ.वानखेडे

उमरखेड/प्रतिनिधी-उमरखेड विधानसभा मतदारसंघात किमान २००० कोटींचा मोठा औद्योगिक प्रकल्प मंजूर करावा, अशी मागणी आ.किसन वानखेडे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.

या प्रकल्पामुळे उमरखेडसह महागाव परिसरातील हजारो युवकांना स्थानिक पातळीवर रोजगार मिळेल आणि स्थलांतराला आळा बसेल,



असा विश्वास वानखेडे यांनी निवेदनात व्यक्त केला. दावोस परिषदेत महाराष्ट्रात झालेल्या विक्रमी गुंतवणुकीच्या पार्श्वभूमीवर विदर्भातील मागास भागांनाही न्याय मिळावा, अशी भूमिका त्यांनी मांडली.निवेदनात त्यांनी स्पष्ट केले की, उमरखेड परिसर औद्योगिक प्रकल्पासाठी अनुकूल आहे. नागपूर-तुळजापूर राष्ट्रीय महामार्ग, प्रस्तावित शक्तीपीठ महामार्ग, वर्धा-यवतमाळ-नांदेड रेल्वेमार्ग आणि जवळील विमानतळामुळे वाहतूक सुविधा सक्षम आहेत. तसेच ऊस, हळद, कापूस, सोयाबीन यांसारखे कृषी उत्पादन मुबलक असल्याने प्रक्रिया उद्योगांना मोठी संधी आहे.या पार्श्वभूमीवर उमरखेड मतदारसंघासाठी विशेष औद्योगिक पॅकेज जाहीर करून तातडीने उद्योग मंजूर करावा, अशी मागणी आ. वानखेडे यांनी केली आहे. मुख्यमंत्र्यांनी या प्रस्तावाची गांभीर्याने दखल घ्यावी, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

पान १ वरुन

## 'शिंदेंना फडणवीसांना...

शिवसेनेतून बाहेर पडलेल्या खासदारांच्या मतदारसंघांचा दौरा करत असलेल्या ठाकरे यांनी शिर्डीतील सभेत माजी खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांच्यावरही टीकेची झोड उठवली. गद्दारी काहींच्या रक्तातच असते. शिवसैनिकांनी पदरमोड करून निवडून दिलेल्या प्रतिनिधींनी मतदारांचा विश्वासघात केला, असे ते म्हणाले.साईबाबांच्या समाधीचे दर्शन घेतल्यानंतर ठाकरे यांनी भ्रष्ट राजवट संपुष्टात येऊ दे आणि देवेंद्र फडणवीस यांच्या खुर्चीचे रक्षण कर, अशी साईचरणी प्रार्थना केल्याचे सांगितले. तसेच, २०२९ नंतर फडणवीस राज्याच्या नेतृत्वाच्या शर्यतीत पुढे येऊ शकतात, त्यामुळे त्यांना रोखण्यासाठीच भाजपकडून शिंदे गटाचा वापर केला जात असल्याचा आरोपही त्यांनी केला.खासदार फोडण्यामागे केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भूमिका असल्याचा पुनरुच्चार करत ठाकरे म्हणाले की, राज्यात भाजपपेक्षा शिंदे गटाचे खासदार अधिक झाल्याने हा सर्व राजकीय डाव स्पष्ट झाला आहे. खासदार फोडण्यासाठी पैसा उपलब्ध आहे; मात्र शेतकऱ्यांच्या अडचणींकडे दुर्लक्ष केले जात आहे, अशी टीकाही त्यांनी केली.यावेळी विधानसभा अध्यक्षांवर निशाणा साधत ठाकरे म्हणाले, ज्यांना मराठी नीट बोलता येत नाही, ते माझ्या पक्षाच्या भवितव्याचा निर्णय देत आहेत, ही महाराष्ट्राची शोकांतिका आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांच्या माझे पंख नाहीत या वक्तव्यावरही त्यांनी उपरोधिक टिप्पणी केली.राज्यात सुरू असलेल्या फोडाफोडीच्या राजकारणावर टीका करत ठाकरे यांनी कार्यकर्त्यांना संघटित राहण्याचे आवाहन केले. साधा शिवसैनिक आजही आमच्यासोबत आहे. पुढील तीन वर्षांत पुन्हा सत्ता परिवर्तन घडू शकते, असा विश्वास व्यक्त करत त्यांनी आगामी काळात शिवसेना (उबाठा) अधिक ताकदीने उभी राहील, असा दावा केला.

हे वृत्तपत्र प्रकाशक, मालक व संपादक प्रदिप अनंतराव नागापूरकर यांनी मुद्रक अब्दुल गफुर अब्दुल रझाक यांच्या सिमा प्रिंटींग ॲण्ड लिथो प्रिंटींग प्रेस इतवारा बाजार नांदेड, ता.जि.नांदेड येथे छापून नागापूरकर हाऊस, हाऊस नं.१-१०-६९३, विनायकनगर, नवा मोंढा, ता.जि.नांदेड-२ येथे प्रकाशीत केले.आर. एन. आय. नं. ४७१३५/८८ E-mail: nandedwarta@mail.com, मो.९४२२१७४७७४